

पॉल बनयन

लेखक
जी. प्रकाश


चित्रकार
जीन. डी. लेमॉस

बलदंड बनवान

· लेखक ·
जी. प्रकाश

अनुवादक
भा. रा. भागवत


चित्रकार
जीन डी. लेमोस



पॉल बनयन हा अमेरिकेच्या लोकसाहित्यांतला एक विख्यात पुरुष आहे. तो अंगाबांध्यानें आणि शक्तीनें प्रचंड होता. आपल्या शक्तीच्या जोरावर अचाट कामें करून तो लोकांना आश्चर्यचकित करीत असे. त्याच्याबरोबर त्याचा बैल असे. तोहि तसाच दांडगा. पॉल जेव्हां एक वर्षाचा होता तेव्हांच तो अंगानें एवढा मोठा होता कीं त्याचा पाळणाच घरांत ठेवणें कठीण झालें. तो शाळेंत गेला तेव्हां शाळेच्या खोलींत त्याला बसतांच येईना. म्हणून त्याला शाळेच्या बाहेरील आवारांत बसावें लागत असे. पुढें मोठमोठीं झाडें तो नुसता धक्का देऊन पाडत असे.

किंमत : रु. १.००





मायकेल पीटर्सन आपल्या घराच्या खिडकीशीं उभा होता. अमेरिकें-तल्या मेन राज्यांत होतें हें पीटर्सन मंडळींचें छोटें घर. पांच वाज-लेले होते. वसंत ऋतूंतली गारठ्याची संध्याकाळ होती. आणि मायकेलची नजर रस्त्यावरून फिरत असतांच एकीकडे तो पाय झटकीत होता. एकदा हा पाय टेक, तो उचल, मग तो टेक हा उचल असें त्याचें चाललें होतें. आपले बाबा घरीं केव्हां येतात याची तो वाट बघत होता.

मायकेलचे बाबा होते लाकुडतोडचे. दुसऱ्या लाकुडतोडचां-बरोबर ते रानांत कामाला जात; कुऱ्हाडीनें झाडें तोडीत. झाड खालीं कोसळलें कीं लाकुडतोडचे त्याच्या फांद्या उडवीत. मग झाड कापून त्याचे ओंडके करीत. ओंडके कशाला ? गिरणींत न्यायला. तिथें करवतीनें कापून त्यांच्या फळ्या बनवायला.

शनिवारीं शाळा नसे, तेव्हां कधीं कधीं मायकेलचे बाबा त्याला आपल्याबरोबर गिरणींत नेत. तिथें मोठमोठ्या करवतींनीं ओंडके


कापले जाऊन त्यांच्या फळ्या कशा बनतात तें तो पाही. फळ्या कशाला ? घरें बांधायला. टेबलखुर्च्यांसारखें सामान करायला. हो— आणखी जहाजें पण बांधायला. कांहीं लाकडें भरडून त्यांचा रंधा कसा करतात तें पण तो पाही. रंधा कशाला ? कागद बनवायला. पुस्तकांसाठीं नि वर्तमानपत्रांसाठीं कागद हवा ना ? म्हणून.

उद्यां शनिवार. मायकेलला वाटत होतें कीं उद्यां बाबा आपल्याला गिरणींत नेतील. इतक्यांत—दिसलेच त्याला आपले बाबा येतांना रस्त्यावरून. त्यांच्याबरोबर त्यांचे दोन मित्र होते.

"हॅलो—मायकेल !" सर्व मंडळी या लहानशा घरांत शिरली तेव्हां बाबा म्हणाले. बाबांच्या चेहऱ्यावर एवढें हसूं पसरलें होतें कीं मायकेलनें ओळखलें-जेवण झाल्यावर बाबांच्या तोंडून कांहीं छान छान गोष्टी ऐकायला मिळणार.

मायकेल नि त्याच्या घरची मंडळी ज्या खेड्यांत राहात असत, तिथें किराणा मालाचें एकच दुकान होतें. गांवांत सिनेमा नव्हता, चांगले रस्ते नव्हते, आणि तिथून दुसरा गांव तर कित्ती कित्ती मैल दूर होता. संध्याकाळचा वेळ घालवण्याचा उत्तम मार्ग तिथें एकच असे—ओंडक्यांची शेकोटी पेटवून तिच्या भडकत्या ज्वाळांभोंवतीं बसायचें आणि गोष्टी सांगायच्या.

पुष्कळदां लाकुडतोड्यांमध्यें चढाओढ लागे—आपली गोष्ट सर्वांत जास्त फुगवून कोण सांगतो ? अशी गोष्ट म्हणजे साधी नसते—भाकडकथा. जें कधींच घडूं शकणार नाहीं त्याची गोष्ट म्हणजे भाकडकथा. भाकडकथा कोणालाच मनापासून खरी वाटत नाहीं हें मायकेलला माहीत होतें. पण खरी नाहीं वाटली म्हणून काय झालें ?



मायकेलचे बाबा ही शर्यत जवळ-जवळ नेहमींच जिंकीत असत म्हणा ना! त्यांच्या गोष्टीही नेहमीं ठरलेल्या असत–पॉल बनयन नामक लाकुडतोड्याच्या गोष्टी. बनयन नांवाचा अर्थच मुळीं वटवृक्ष–वडाचें झाड! वडाचें झाड खूप खूप मोठें वाढतें, माहीत आहे ना?

अमेरिकेच्या एकूण एक संयुक्त राज्यांत लाकुडतोड्या-च्या जेवढ्या म्हणून छावण्या होत्या ना, त्या सर्व पालथ्या घातल्या तरी पॉल बनयन इतका दांडगा माणूस मिळाला नसता. सर्वांत ताकदवान् मनुष्य कोण– तर पॉल बनयन. आणि सर्वांत मोठा नि ताकदवान् बैल कोण– तर पॉल बनयनचा आवडता बैलोबा–बेब, हें अगदीं निश्चित, बरं का? मायकेलचे बाबा सांगत कीं बेबचीं शिंगें फारच फताडीं–एका शिंगाच्या टोका-पासून दुसऱ्या शिंगाच्या टोका-पर्यंत लांबी मोजली तर कुऱ्हाडीचे दहा दांडे भरतील म्हणे! पण बेबमध्यें सर्वांत छानदार कांहीं असेल तर तें म्हणजे त्याच्या अंगाचा रंग. गडद निळी सुरेख कातडी होती त्याची.





त्या रात्रीं जेवण झाल्यावर सर्व लोक शेकोटीजवळ कॉफी पीत बसले होते. मायकेल म्हणाला, "बाबा, पॉल बनयन जेव्हां छोटा मुलगा होता तेव्हां तो कसा दिसायचा ?"

मायकेलच्या बाबांनीं पाइपचा झुरका ओढला; कॉफीच्या भांड्यांतून त्यांनीं एक घोट घेतला; आणि मग ही गोष्ट सांगितली—

पॉल बनयन जेव्हां कुकुबाळ होता ना—म्हणजे केवढा ? एक दिवसाचा—तेव्हां त्यानें आपलें तोंड उघडलें आणि रडायला सुरवात केली. असा रडला म्हणतां तो !—आवाज एवढा मोठा, कीं पावसाच्या देवांना वाटलें हे ढग गडगडत आहेत. आणि म्हणून त्यांनीं लगेच पाऊस पाडायला सुरवात केली.






एका वर्षांतच पॉल एवढा मोठा झाला, कीं त्याच्या आईबाबांच्या घरांत त्याचा पाळणा ठेवायला आतां जागाच पुरेना. आणि तो झोपेंत या कुशीचा त्या कुशीवर वळला कीं जमीन हादरूं लागे. लोकांना वाटे, भूकंप झाला ! पॉलच्या आईबाबांना कळेना, याचे आतां करावें तरीं काय ? शेजाऱ्यांना पण कळेना, करावें तरी काय ? शेवटीं सर्वजण एकत्र जमले. त्यांनीं मोठ्यांत मोठा ओंडका शोधून काढला; आणि त्याची एक होडी तयार केली. होडी म्हणजे साधी नाहीं—सपाट तराफा, त्या तराफ्यावर त्यांनीं एक प्रचंड पाळणा ठेवला आणि त्या पाळण्यांत पॉलला ठेवलें. मग त्यानीं सहा मोठीं जहाजे आणलीं. कशाला ? तर तो तराफा समुद्रांत ओढून न्यायला. तिथें तराफा जेव्हां नांगर टाकून उभा राहिला, तेव्हां सर्वांना हायसें वाटलें. प्रत्येकाला वाटलें, आतां रात्रीं झोप चांगली लागणार ! पण कसचें काय ? रात्रभर पॉलनें अंशी दांडगाई केली—इतका वळला नि इतका लोळला, कीं समुद्राचें सारें पाणी त्यानें घुसळून टाकलें. त्यामुळें प्रचंड लाटा उसळल्या आणि किनाऱ्यावर येऊन आदळल्या. कितीतरी खेड्यांतून पाणीच पाणी झालें. दुसऱ्या दिवशीं लोकांनीं ठरवलें कीं पॉल बनयनला किनाऱ्यावर परत आणायचें !

लवकरच पॉल शाळेंत जाण्याइतका मोठा झाला. गांवांत एक लहानशी, एका खोलीची, लाल रंगाची शाळा होती. पॉलच्या घरापासून फार लांब नव्हती ती. पण पॉल इतक्या सपाटयानें वाढत होता, कीं त्याला शाळेच्या इमारतींत शिरतांच येईना. मास्तरांनीं सांगितलें, तूं आपला बाहेर आंगणांतच बैस. आणि मग आंत बसलेल्या मास्तरांनीं खिडकींतून ओरडून त्याला धडे शिकवले.

पण लिहिण्या-वाचण्याची पाळी आली तेव्हां पॉलला फळाच दिसेना. मग मास्तरांनीं त्याला काळचा दगडाच्या मोठ्या खाणीकडे नेलें. इथल्याच लाद्या काढून शाळेंतल्या मुलांसाठीं त्यांच्या पाटचा बनवीत असत. पॉलनें पाहिलें तर आपले मास्तर खाणींतल्या एका भिताडावर चढत आहेत. ही भित म्हणजे डोंगराची एक चढणच होती म्हणा ना. हातांत मोठा थोरला खडू घेऊन मास्तरांनीं त्या राक्षसी पाटीवर पहिलें अक्षर लिहिलें–A.

मास्तरांना तें अक्षर खूपच प्रचंड काढावें लागलें. चार दिवस खपून बिचाऱ्यांनीं तें पुरें केलें. मग तें पुसायचें. पुसायला दोन दिवस लागले. आणि मग दुसरें अक्षर B काढायला आणखी चार दिवस. आतां मात्र बिचारे मास्तर इतके थकून गेले कीं त्यांनीं तो नाद सोडून दिला. यामुळें पॉल बनयन लिहावाचायला कधीं शिकलाच नाहीं.



नंतर कितीतरी वर्षांनीं पॉल जेव्हां बराच मोठा झाला, तेव्हां अमेरिकेंतला सर्वांत उत्तम लाकुडतोड्या म्हणून लोक त्याला ओळखूं लागले. तो पुष्कळदा काम करतां करतां थांबायचा आणि जॉनी इंकस्लिंगरकडे रोखून बघायचा. इंकस्लिंगर—या नांवाचा अर्थच मुळीं शाईझटके !—हा लाकुडतोड्यांच्या छावणींतला कारकून होता. तो पुस्तक कसा वाचतो किंवा पत्र कसा लिहितो हें बघत असतांना पॉलच्या डोळ्यांवर दुःखाची झांक येई. कारण त्याला कळून चुकलें होतें कीं आयुष्यांतल्या एका फार फार मोठ्या गोष्टीला आपण मुकलों आहों.





पॉल सोळा वर्षांचा होईपर्यंत आपल्या आईबाबांकडे राहिला. आतां तो एवढा मोठा झाला होता कीं त्याला घरांत निजणें शक्य नव्हतें. बाहेर शेतांतच झोपायचा तो. एक दिवस असाच तो मावळत्या सूर्याकडे पाहात होता. उंच आकाशांत एवढ्यांतच रात्र पडली होती. बदकांचा एक थवा पश्चिमेकडे उडत चालला होता. त्यांचें ओरडणें पॉलनें ऐकलें. विचित्र आवाज होता तो. तो आवाज जणूं पॉलला सांगत होता, कीं पॉल, ऊठ. तूं जगांत स्वतःच्या हिमतीवर हिंडून आपलें नशीब काढण्याची वेळ आतां आली आहे.

दुसऱ्याच दिवशीं आईबाबांचा निरोप घेऊन त्यानें घर सोडलें. आणि इथेंच पॉल बनयनच्या बाळपणाचा शेवट झाला.





मायकेलच्या बाबांनीं ही गोष्ट संपवली, तोंवर बराच उशीर झालेला होता. आणि मायकेल इतका पेंगुळला होता कीं त्याला उचलूनच बिछान्याकडे न्यावें लागलें.


नंतर कांहीं दिवसांनीं रात्रीचें जेवण झाल्यावर मायकेल आपल्या बाबांना म्हणाला, "पॉल बनयननें घर सोडल्यावर पुढें काय केलं हो ?"

"त्याचं असं झालं, मायकेल—" बाबा म्हणाले, "लाकुड-तोडचांच्या एका छावणींत काम मिळवायला त्याला अडचण पडली नाहीं. एकतर, दिवसाकांठीं दुसरीं सगळीं माणसं मिळून जेवढीं लाकडं तोडीत त्याच्यापेक्षां जास्त लाकडं हा एकटा तोडायचा. कुऱ्हाडीला नुसते चार हेलकावे देऊन हा पठ्ठ्या मोठ्यांत मोठ्या झाडाची कत्तल करी. आणि त्याचा सपाटा असा, कीं लगेच छाव-णींत धाव मारून कुऱ्हाडीला धार लावून पुन्हा दुसरं झाड तोडा-यला हा हजर व्हायचा—पहिलं झाड जमिनीवर पडायच्या आंत ! रात्रीं आपल्या टोलेजंग खोलींत तो राकेलच्या दिव्याची वात फूंक मारून विझवायचा अन् दिवा विझून अंधार पडायच्या आंत उडी मारून बिछान्यांत घुसायचा !"

"त्याला मित्र पुष्कळ होते का हो ?" मायकेलनें विचारलें.

मायकेलच्या बाबांनीं मान डोलावली. ते जरासे हसले आणि त्यांनीं ही गोष्ट सांगितली—

लाकुडतोडयांच्या ज्या छावणींत पॉल काम करीत असे; तिथले बैल त्याला फार पिटुकले न् मंद वाटत. पॉलला हवे तितके पटापट ओंडके ओढून आणणें कांहीं त्यांच्यानें कधीं होत नसे. आणि मग एक दिवस त्याच्या कानांवर आलें, कीं एक सुंदर निळाशार बैल म्हणे जंगलाच्या आंतल्या भागांत राहतो. तो इतका जंगली आहे, कीं त्याला वठणीवर आणण्यासाठीं दोन लाकुडतोडचे गेले त्यांना त्यानें जवळजवळ ठारच मारलें म्हणा ना !



एका पहाटे पॉलनें एक मोठें पोतें कोंडयानें भरून घेतलें. कोंडा म्हणजे बैलाचें आवडतें खाद्य, हें सर्वांना माहीत आहेच.

मग तो निळा बैल ज्या जंगलांत राहात असे तिकडे पॉल गेला. जंगलांत एक मोकळी जागा होती तिच्या मध्यभागीं पॉलनें कोंडयाचा एक लहानसा ढीग रचला आणि तो गुपचूप तिथें बसून राहिला. थोडीं मिनिटें त्यानें वाट पाहिली न पाहिली, तों निळा बैल त्या मोकळया जागेंत आला. त्यानें एकदा हवेंत हुंगून पाहिलें; मग कोंडा खायला सुरवात केली.

"ओ हो हो !" पॉल आपल्या मनाशीं म्हणतो, "या निळया बैलाइतका सुंदर प्राणी मीं जन्मांत कधीं पाहिलेला नाहीं !"

खूप मोठा होता तो बैल. जवळजवळ पॉलच्या छातीइतका उंच. म्हणजे जवळजवळ हत्ती एवढा मोठा असणारच. त्याच्या अंगाचा रंग दाट गहिरा निळा निळा होता आणि त्याचीं शिंगें होतीं हस्तिदंताच्या रंगाचीं.

पॉल उभा राहिला आणि ओरडला. लगेच बैलानें डोकें खालीं केलें आणि पॉलवर धडक मारली. पॉल स्वस्थ उभा होता; त्यानें कांहीं केलें नाहीं. तीं भलीं मोठीं शिंगें जेव्हां त्याच्या बरगड्यांवर आपटलीं तेव्हां पॉल हंसायला लागला आणि म्हणाला, "थांब !–थांबव हा प्रकार ! तूं मला गुदगदल्या करतो आहेस."

निळ्या बैलाला कळलें, कीं अखेरीस आपल्याला हवा तसा धनी मिळाला. त्यानें पॉलच्या हाताला आपलें डोकें घासलें. पॉलनें शिगांच्या मधोमध त्याचें कपाळ थोपटलें; आणि तो म्हणाला, "हात्तिच्या ! तूं एखाद्या लहान बाळासारखा गरीब आहेस कीं रे ! तुला मी हांकही तशीच मारणार, बरं का ?–बेब !"

त्या दिवसापासून जिथें जिथें पॉल जाई तिथें तिथें बेब जाऊं लागला.



मायकेलचे बाबा पाइप भरण्यासाठीं थांबले, तेव्हां मायकेल म्हणाला,

"बेबशिवाय आणखी कुणी मित्र नव्हते का पॉल बनयनला ?"

"अं–होते कीं, मायकेल !" त्याचे बाबा म्हणाले. "हेल्स हेल्सनबद्दल तूं ऐकलेलं नाहीं का ?–थांब, मी सांगतों तुला–"

एक दिवस पॉल बनयन नि दुसरे लाकुडतोडचे यांना जंगलांतून आवाज ऐकूं आला—झाडें पडत असल्याचा आवाज. आणि मग रानांतून एक माणूस बाहेर पडला. लांबच लांब तांबडी दाढी होती त्याची. चालतां चालतां वाटेंतल्या झाडांना लाथा मारून तीं पाडीत त्यानें स्वतःसाठीं रस्ता केला होता.

तो आला तो सरळ छावणीच्या मुख्याकडे गेला आणि म्हणाला, "बोला–जगांतला सर्वांत उत्तम लाकुडतोड्या हवा आहे तुमचं काम करायला ?"

"तो आधींपासूनच आहे कीं आमच्याकडे," मुख्यानें उत्तर दिलें. "त्याचं नांव पॉल बनयन."

लाल दाढीवाला हसला. इतक्या मोठ्यानें हसला, कीं आसपासच्या टेकड्या हादरायला लागल्या. मग तो म्हणाला, "माझं नांव हेल्स हेल्सन–जगांतला सर्वोत्तम लाकुडतोड्या."

यावर मालक काय बोलणार ? त्याला एकच करणें शक्य होतें–तें म्हणजे उत्तम लाकुडतोड्या कोण, पॉल बनयन कीं हेल्स हेल्सन, तें ठरवण्यासाठीं दोघांची शर्यत लावणें.

पहिली पाळी होती हेल्सची. त्यानें एक कुऱ्हाड घेतली उजव्या हातांत; एक घेतली डाव्या हातांत; आणि एकाच वेळीं घाव घालून दोन झाडें तोडलीं. तीं झाडें जमिनीवर पडायच्या आंत त्यानें



कुऱ्हाडी टाकल्या, एकेका हातांत एकेक झाड अशीं दोन्ही झाडें पकडलीं, आणि तीं गिरणीच्या दिशेला भिरकावून दिलीं. गिरणी होती दोन मैल दूर !

हा प्रकार पाहात असलेल्या लाकुडतोडयांचा स्वत:च्या डोळयांवर विश्वास बसेना. यापूर्वीं असले कांहीं त्यांनीं कधीं कधीं पाहिलेलें नव्हतें.

आतां शर्यतींत भाग घेण्याचीं पॉल वर पाळी आली. त्यानें मजबूत गवताचा एक दोर विणला आणि त्या दोराला आपली कुऱ्हाड बांधली. मग त्यानें आपल्या डोक्यावर ती गरगर फिरवली आणि सोडून दिली. कुऱ्हाड गेली सपासप झाडें कापीत. पन्नास झाडें तिनें कापलीं तेव्हां कुठें तिची हालचाल थांबली.



सर्व लाकुडतोड्यांनीं टाळ्यांचा गजर केला. हेल्सला फार फार राग आला. त्यानें पॉलला कुस्तीच्या पेचांत पकडावें तसें पकडण्याचा प्रयत्न केला. पण पॉलची छाती एवढी मोठी होती, कीं त्याचे हात तिच्यामोंवतीं पोचेचनात. त्यानें आपली मूठ वळली आणि पॉलच्या हनुवटीवर एक ठोसा हाणला. पॉल होता तस्सा ताठ उभा राहिला; आणि हेल्सच्या हाताला मात्र दुखापत झाली.

हेल्स रागानें भडकला. तो अर्धा मैल मागें गेला आणि धांवत येऊन त्यानें पॉलच्या अंगावर बैलासारखी धडक दिली. त्याचें डोकें सरळ पॉलच्या पोटावर आदळलें; आणि तो स्वत: भुईसपाट आडवा पडला.

शेवटीं हेल्स जेव्हां कसाबसा उठून उभा राहिला, तेव्हां त्यानें पॉलचा हात धरून गदगदा हलवला. मग मालकांकडे वळून तो हसत हसत म्हणाला, "का हो मालक ! जगांतला दोन नंबरचा उत्तम लाकुडतोड्या तुम्हांला हवा आहे का काम करायला ?"

"आणि अशा रीतीनें—" मायकेलचे बाबा म्हणाले, "पॉल बनयन नि हेल्स हेल्सन एकमेकांचे जानी दोस्त बनले."




ा गजर केला. हेल्सला फार फार
ा पेचांत पकडावें तसें पकडण्याचा
वढी मोठी होती, कीं त्याचे हात
पली मूठ वळली आणि पॅालच्या
होता तस्सा ताठ उभा राहिला;
पत झाली.

र्धा मैल मागें गेला आणि धांवत
सारखी धडक दिली. त्याचें डोकें
आणि तो स्वतः भुईसपाट आडवा

उठून उभा राहिला, तेव्हां त्यानें
. मग मालकांकडे वळून तो हसत
जगांतला दोन नंबरचा उत्तम
का काम करायला ?"

ायकेलचे बाबा म्हणाले, "पॅाल
जानी दोस्त बनले."



दुसऱ्या दिवशीं मायकेलच्या मनांत दिवसभर तेच विचार घोळत होते–पॉल बनयन आणि त्याच्या विलक्षण साहस कथा. त्याला माहीत होतें, की आज संध्याकाळींच आपल्या घरीं भाकडकथांची चढाओढ होणार आहे. त्यावेळीं आपलें बाबा पॉल बनयनच्या आणखी कांहीं गोष्टो सांगतील अशी त्याची खात्री होती.

जेवण झाल्यावर तो शेकोटीजवळ गुपचूप बसून राहिला–कुणीं आपल्याला पाहूं नये आणि झोपायला पाठवूं नयें म्हणून.

पहिली पाळी त्याच्या बाबांवर आली. त्यांनीं आपला घसा साफ केला आणि सूरवात केली

पॉल बनयनची जंगलांतल्या प्राण्यांशीं नेहमीं झकाझकी उडायची. म्हणजे साध्या माणसांची उडते तशी नाहीं. एक दिवस असेंच जंगलांत काम करून झाल्यावर पॉलनें ठरवलें, बस्स्. आज इथेंच झोपायचें. छावणीवर परत जायचें नाहीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो लवकर उठला आणि नेमका न्याहारीच्या वेळेवर छावणींत पोचला. तिथें तो मेजाशीं बसणार इतक्यांत हेल्स हेल्सननें एकदम विचारलें, "पॉल, तुझ्या पाठीमागच्या खिशांत गोळा दिसतो तो कसला ?"



पॉलने खिसा चांचपला. खरोखरच तिथें कसला तरी गोळा लागत होता हाताला. त्यानें खिशांत हात घातला आणि बाहेर ओढून काढलें—एक मोठे पिंगट रंगाचें अस्वल ! त्या अस्वलाला वाटलें होतें कीं पॉलचा खिसा म्हणजे एक गुहाच आहे. म्हणून रात्रीं तें रांगत आंत शिरलें होतें आणि तिथेंच झोपलें होतें.



ही गंमत कळल्यावर पॉल नि हेल्स इतके कांहीं हसले की त्यांना खूप खूप तहान लागली. ती तहान भागवायची म्हणजे कितीतरी कॉफी लागली असती. तेवढी कॉफी करायची एकच युक्ति होती. कॉफीचीं पोतीं नदींत रिकामीं करणें आणि मग सबंध नदी उकळणें.

मायकेल आश्चर्यानें डोळे फाडफाडून पाहूं लागला. आपले बाबा चढाओढ जिंकणार याबद्दल त्याला शंका राहिली नाहीं. दुसऱ्या लोकांनीं आपल्या भाकडकथा सांगितल्या आणि मग मायकेलच्या बाबांची दुसरी पाळी आली

एक दिवस म्हणे असें झालें, कीं दुसऱ्या एका छावणींतला एक लाकुडतोड्या आला आणि पॉलला म्हणाला, "माझ्याशीं शर्यतीची पैज मारतोस ?"



या लाकुडतोड्याजवळ त्याचा एक आवडता लांडगा होता. लाकुडतोड्या म्हणाला, "माझा लांडगा तुझ्या निळ्या बैलापेक्षां—बेबपेक्षां जोरांत धावेल. अगदीं सहज !"

पॉल तें ऐकून हसला. तो म्हणाला, "बेब शर्यत जिंकेल याबद्दल माझी इतकी खात्री आहे, कीं या शर्यतींत तुझ्या लांडग्याला भरपूर संधी मिळावी म्हणून मी बेबच्या पाठीवर स्वार व्हायला तयार आहें."

लाकुडतोड्यांनीं ठरवलें कीं शर्यत तीन मैल लांबीची असावी. त्या भागांतल्या सर्व खेड्यांतून नि गांवांतून शर्यत पाहायला लोक आले. कांहीं जणांना वाटलें कीं बेबच्या पाठीवर पॉल बसूनदेखील बेबच शर्यत जिंकील. पण बहुतेकांना वाटलें कीं बेब जिंकण्याचा कांहीं-सुद्धा संभव नाहीं.


लाकुडतोड्यांच्या छावणींचा मुख्य जेव्हां ओरडला, "जा !"- तेव्हां लांडगा असा धावत सुटला कीं जशी विजेची चमक ! विजयाच्या खांबापासून अर्ध्या अंतरावर तो पोचला, तरी बेब जागचा हलला नव्हता. प्रत्येकाला वाटलें कीं बेबनें शर्यतीचा नाद सोडला. पण पॉल एकदम म्हणाला, "अच्छा, बेब ! चला जाऊं या आपण !"

बेब असा सपाट्यानें निघाला, कीं त्याला कुणी सुटतांना सुद्धां पाहिलें नाहीं. एक क्षण तो जागेवर होता, दुसऱ्या क्षणीं तो पसार! इतक्या सोसाट्यानें धावला तो, कीं शर्यत तर त्यानें जिंकलीच, पण त्याची सावली जी मागें पडली ती बेब परत घरीं जायला निघाला तोपर्यंत त्याला गांठूं शकली नाहीं.

"वा ! फार छान गोष्ट !" मायकेल टाळ्या वाजवीत म्हणाला.

त्याच्या बाबांनीं आश्चर्यानें त्याच्याकडे पाहिलें. "तूं अजून जागा !" ते म्हणाले, "तूं केव्हांच झोपायला हवं होतंस."

मायकेल लगेच झोपायला गेला. त्याची पक्की खात्री झाली होती कीं भाकडकथांची ही चढाओढ पण आपल्या बाबांनींच जिंकली !



त्यानंतर बरेच दिवस मायकेलला पॉल बनयनच्या आणखी गोष्टी ऐकायला मिळाल्या नाहींत. आणि मग एका रविवारीं, बाबांना छावणींत काम नव्हतें अशा वेळीं दुपारीं सर्व मंडळी एखादी लांबलचक गोष्ट ऐकायला मिळावी म्हणून बसली.

"पॉलची स्वतःची एक लाकुडतोडे कंपनी होती, ती गोष्ट सांगितली का मीं तुम्हांला ?" मायकेलच्या बाबांनीं विचारलें.

"नाहीं" मायकेल म्हणाला. "गोष्टीच्या नांवावरून छान असणार असं वाटतं."

"छान आहे हें तर नक्कीच" बाबा म्हणाले. आणि त्यांनी सुरवात केली—


प्रत्येकाला माहीत होतें कीं पॉल बनयनला एकाच ठिकाणीं जास्त दिवस राहणें आवडत नाहीं. एके दिवशीं सकाळीं जेव्हां पॉल हेल्सला म्हणाला, "चल रे, आपण दुसरीकडे जाऊं या," तेव्हां कुणालाच नवल वाटलें नाहीं.

या खेपेस पॉलच्या डोक्यांत एक नवीनच डाव आलेला होता. त्याला स्वतःची लाकुडतोडे कंपनी काढायची होती. तो स्वतः मालक किंवा मुख्य. हेल्स हा दुय्यम किंवा उपमुख्य. कामगार म्हणून सबंध अमेरिकेंतून उत्तमोत्तम असे सात लोक त्यांनीं निवडून घेतले. बैल म्हणून एकटा बेब त्यांना पुरेसा होता. स्वतःचा उद्योगधंदा काढण्याची त्यांची आतां तयारी झाली होती.




पॉल बनयनच्या कंपनीनें साध्या कामांकडे ढुंकून पाहिलें नाहीं. त्यांना फक्त अशीं कामें हवीं होतीं कीं जीं साध्या कंपन्यांना नको होतीं किंवा त्यांना जी करतांच आलीं नसतीं. एवढ्यासाठीं पॉल बनयन कंपनीनें कोणतें काम हातीं घेतलें, माहीत आहे ? अपसाइड माऊंटन किंवा उरफाटा पर्वत त्यांनीं आपल्या कामासाठीं निवडला.

उरफाटा पर्वत हा एक फार चमत्कारिक पर्वत होता. पायथ्याशीं मोठा असून शिखराला टोकदार असण्याऐवजीं तो पायथ्याशीं टोकदार होता आणि वर शिखराकडे मोठा मोठा होत गेला होता. त्याच्यावर चांगलीं चांगलीं झाडें होतीं. त्यांच्या फळ्या छान झाल्या असत्या. पण त्याच्या उलट्या उतरणीवर उभें राहणार कोण आणि तीं कापणार कोण ? एखाद्यानें कधीं काळीं प्रयत्न केलाच, तर हां हां म्हणतां त्याची घसरगुंडी व्हायची.



हें काम मिळालें म्हणून पॉलची कोण गडबड उडून गेली होती ! काम कठीण असणारच—कठीण कामेंच तर त्याला आवडत —पण शिवाय त्या भागांत जे विचित्र प्राणी राहात ते त्याला आतां बघायला मिळणार होते. या विचित्र प्राण्यांत एक कोंबडी होती. ती म्हणे चौकोनी अंडीं घाली—म्हणजे तीं डोंगरावरून घसरण्याची भीति नको ! दुसरा प्राणी म्हणजे चार पायांचा कावळा होता. या कावळ्याला दोन पाय खालीं होते आणि दोन पाय पाठीवर. त्यामुळें जमिनीवर उतरतांना तो उलटा उतरूं शकत असे.

पॉलनें उरफाट्या पर्वताकडे पाहिलें. त्याच्यावरचीं झाडें कशीं तोडावींत याचा तो विचार करूं लागला. पहिल्यानें त्यानें काय केलें—एका हातानें डोंगराला धरून दुसऱ्या हातानें कुऱ्हाड चालवून पाहिली. पण तें जमेना. तेव्हां हेल्सच्या खांद्यांवर उभें राहून झाड तोडण्याचा त्यानें प्रयत्न केला. पण तेंही जमलें नाहीं. तेव्हां त्यानें





असें ठरवलें कीं हीं झाडें तोडण्याचा मार्ग एकच दिसतो आहे. तो म्हणजे सबंध पर्वत उपटायचा आणि जमिनीवर आडवा ठेवायचा; म्हणजे तो वाटेल तसा लोटतां येईल आणि सर्व बाजूंचीं झाडें तोडतां येतील.

पॉलनें एक लांबलचक नि भक्कम दोर तयार केला. मग त्याचें एक टोक वळवून त्यानें कडें तयार केलें. तें कडें त्यानें उरफाटचा पर्वताभोंवतीं फेकलें. पॉल, हेल्स, बेब नि सात लाकुडतोडचे या सर्वांनीं मिळून एकाच वेळीं तो दोर ओढला. तेव्हां एकदम उरफाटा पर्वत कलंडूं लागला. पॉल ओरडला, "लाकूड-लाकूड !" लोकांनीं वाटेंतून दूर व्हावें म्हणून त्यांना इशारा देण्यासाठीं असें ओरडण्याची लाकुडतोड्यांची पद्धत असते.

आणखी एका मिनिटांत तो उरफाटा पर्वत धाडदिशीं खालीं कोसळला.



यानंतर पॉलच्या पुढें दुसरी कामगिरी कोणती होती ? राऊंड रिव्हर किंवा गोल नदी होती, तिला सरळ करणें.


दुसऱ्या नद्या कशा डोंगरावरून सरळ वहात येऊन समुद्राला मिळतात—तशी ही नदी नव्हती. ती डोंगराला वेटोळीं घालीत वहात रहायची. तिला सरळ करणें जरूर होतें. पण या कामाला कशी काय सुरवात करावी तें पॉलला सुचेना तेव्हां त्यानें कंपनीचा कारकून जॉनी इंकस्लिगर याच्याशीं बोलणें केलें. जॉनीनें नदीचें एक चित्र काढलें. मग त्यानें पॉलला असें दाखवून दिलें कीं नदीच्या एका भागांत ती जर तोडतां आली, तर तिचीं दोन टोकें धरून ती ताणून सरळ करतां येईल.


सुदैवानें दिवस हिंवाळ्याचे होते. नदी गोठून तिचें बर्फ बनलें होतें. पॉल नि ते सात लाकुडतोडचे यांनीं कुऱ्हाडीनें तें फोडलें तेव्हां नदीचे दोन तुकडे झाले.



मग हेल्सने बेबच्या खांद्यावर जोखड घातलें. बेबला त्यांनीं नदीच्या एका टोकाशीं बांधलें आणि पॉल नि सात लाकुडतोडचे यांनीं दुसरें टोक घट्ट धरून ओढलें. हळू हळू नदी सरळ होत चालली; आणि अखेरीस शेवटची एक ओढ देतांच नदीची सरळ रेषा बनली.

मग जेव्हां उन्हाळा आला आणि नदींतलें बर्फ वितळलें, तेव्हां— शहाण्या नद्या कशा थेट समुद्राकडे वहात जातात, तशी—ती थेट समुद्राकडे वाहूं लागली.






"पुढें कोणतं काम केलं पॉलनें ?" मायकेलनें विचारलें.

त्याचे बाबा म्हणाले, 'कांहीं लोक सांगतात कीं पनामा कालव्याचें काम चालू होतें त्यांत त्यानें भाग घेतला. दुसरीं कांहीं लोकं मला असंही सांगणारीं भेटलीं, कीं तो म्हणे चंद्रावर गेला. तिथें आपल्याला न दिसणारी जी चंद्राची बाजू आहे, तिथलीं झाडं तोडण्यांत तो गुंतला आहे. एवढं खरं कीं कित्ती लोक त्याच्या शोधांत आहेत; पण कित्तीतरी वर्षांत तो कुणाला दिसलेला नाहीं."

यानंतर फार दिवस लोटले नाहींत. मायकेलचा दहावा वाढदिवस आला. प्रत्येकाला माहीत आहेच, कीं सबंध वर्षांत एरवीं कधीं दिसत नाहींत अशा गोष्टी आपल्याला वाढदिवसाच्या वेळीं दिसतात !

आपल्या वाढदिवशीं मायकेल फिरत फिरत जंगलांत गेला. तिथें त्याला एक वाट अशी दिसली, कीं पूर्वीं कधीं त्यानें ती बघितलेली नव्हती. त्या वाटेनें तो जरा पुढें गेला. आणि मग परत फिरणार, तोंच—

त्याला बैलाचें ओरडणें ऐकूं आलें. दबकत सरपटत तो पुढें गेला आणि झुडपांमधून पाहूं लागला.



काय दिसलें त्याला त्या रानांत ?

त्याच्या समोरच एक मोकळी जागा होती. त्या मोकळ्या जागेच्या मध्यभागीं एक प्रचंड झाड होतें—काळें कुळकुळीत आणि कुरूप. हजार फांद्या होत्या त्या झाडाला, आणि कमींत कमी दहा लक्ष मुळें होतीं. लाकुडतोड्याच्या तोंडून मायकेलनें जें ऐकलें होतें त्यावरून त्याच्या लक्षांत आलें—


कीं हें झाड म्हणजे पापाचा वृक्ष आहे.

त्या वृक्षाच्या पायथ्याशींच पॉल बनयन, हेल्स हेल्सन, बेब आणि ते सात लाकुडतोडचे उभे होते. नुसते नाहीं. खूप खूप काम करीत, कष्ट करीत. कष्ट करतांना पॉल नि त्याचे लोक गाणीं म्हणत होते. झाडाचें एक मूळ तोडलें न तोडलें, कीं बेब तें ओढीत दूर न्यायचा. पण खरोखरीच तो पापवृक्ष होता. कारण जितक्या झटपट त्यांनीं एक मूळ तोडावें तितक्या झटपट तिथें दुसरें मूळ फुटत असे. मायकेल हें पाहात होता. त्याला कळून चुकलें कीं इतक्या झटपट तोडूनसुद्धा भागायचें नाहीं. याच्याहीपेक्षां वेगानें तोडलें पाहिजे.

आणि खरोखरच पॉलचा नि त्याच्या माणसांचा वेग वाढत होता. हळूहळू का होईना, पण निश्चितपणें वाढत होता.


मायकेल तसाच सरपटत बाहेर आला, आणि पळत सुटला, घरीं पोचेपर्यंत पळत होता तो. आपण काय पाहिलें तें त्यानें सगळ्या लाकुडतोड्यांना सांगितलें.

ते नुसतेच हसलें आणि म्हणाले, "चल ! तूं भाकडकथा सांगतो आहेस.—तुझे बाबा सांगतात तशा !"



पण मायकेलला आतां कळलेलें आहे— पॉल बनयन कुठें आहे तें. ज्या जंगलावर त्याचें खूप खूप प्रेम, त्या जंगलाच्या मध्य-भागीं आहे पॉल बनयन.

तिथें तो काम करण्यांत गुंतलेला आहे. आणि तें काम साधेंसुधें नाहीं सर्वांत मोठें नि कठीण काम करतो आहे पॉल बनयन.





Published by K. K. Vora for Vora & Co., Publishers Pvt. Ltd., at 3, Round Building, Bombay 2 and printed by Pyarelal Sah at the Times of India Press, Bombay, India.

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लिमिटेड
३, राउन्ड बिल्डिंग, काळबादेवी रस्ता, मुंबई २.